**सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००८-०९ करिता**
**वर्गखोली बांधकामे व इतर बांधकामे एकक किंमत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**पूरक शासन निर्णय, क्रमांक -**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक :-**

**वाचा :- श्रीमती वृंदा स्वरूप, सहसचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांचे D.O. No. F-11-7/2007-EE.13, दिनांक ३ जानेवारी, २००८ चे पत्र.**

**प्रस्तावना -** केंद्र शासनाच्या संदर्भाधीन पत्राद्वारे २००८-०९ च्या वार्षिक कार्ययोजना बनविण्यासाठी पडताळणी यादी (Check List) दिली आहे व या पडताळणी यादीनुसार बाबी विचारात घेण्याचे कळविले आहे. पडताळणी यादीतील Annexure 5 मधील मुद्दा क्र. १४ मध्ये नागरी बांधकामाच्या एकक किंमती (Unit Cost) च्या संदर्भातील सूचनेमध्ये राज्य शासनाने नवीन प्राथमिक शाळा व उच्च प्राथमिक शाळांकरिता अधिसूचित केलेले निकष असतील असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने निकष ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -** राज्यात सन २००१-०२ पासून सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत गटसाधन केंद्र, समूहसाधन केंद्र, नवीन प्राथमिक शाळा व सर्व प्रकारच्या वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या आराखड्यानुसार (Drawing & Design) सन २००८-०९ करिता बांधकामासाठी लागणारी एकक रक्कम ही संपूर्ण राज्यासाठी खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | उपक्रम | सन २००७-०८ करिता मंजूर एकक रक्कम (रुपये) | सन २००८-०९ करिता प्रस्तावित एकक रक्कम (रुपये) | वाढ झालेल्या एकक रकमेची टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|
| **१** | **बांधकाम** | | | |
| | १. सपाट भागातील नवीन प्राथमिक शाळा बांधकाम (दोन वर्गखोली व मुख्याध्यापक खोली बांधकाम खर्च ४.५० लक्ष + स्वच्छतागृह (मुलांचे) ०.३५ लक्ष + स्वच्छतागृह (मुलींचे) ०.३५ लक्ष + पिण्याच्या पाण्याची सुविधा ०.४० लक्ष + विद्युतीकरण ०.१५ लक्ष + किचन शेड ०.७५ | ५.०० लक्ष | ६.७५ लक्ष | ३५% |

कृ.मा.प.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | लक्ष + Child Friendly Elements ०.२५ लक्ष) | | | |
| | २. अतिदूर्गम / डोंगराळ / काळ्या मातीतील महानगरपालिका क्षेत्रातील नवीन प्राथमिक शाळा बांधकाम (दोन वर्गखोली व मुख्याध्यापक खोली बांधकाम खर्च ५.१० लक्ष + स्वच्छतागृह (मुलांचे) ०.४० लक्ष + स्वच्छतागृह (मुलींचे) ०.४० लक्ष + पिण्याच्या पाण्याची सुविधा ०.४० लक्ष + विद्युतीकरण ०.१५ लक्ष + किचन शेड ०.८० लक्ष + Child Friendly Elements ०.२५ लक्ष) | ५.०० | ७.५० लक्ष | ५०% |
| | ३. सपाट भागातील नवीन उच्च प्राथमिक शाळा (वर्गखोल्या) (बांधकाम खर्च २.५० लक्ष + Child Friendly Elements ०.२५ लक्ष) | २.२५ लक्ष | २.७५ लक्ष | २२.२२% |
| | ४. सपाट भागातील शाळांना अतिरिक्त वर्गखोल्या (बांधकाम खर्च २.५० लक्ष + Child Friendly Elements ०.२५ लक्ष) | २.२५ लक्ष | २.७५ लक्ष | २२.२२% |
| | ५. अतिदूर्गम / डोंगराळ / काळ्या मातीतील नवीन उच्च प्राथ. शाळा/ अतिरिक्त वर्गखोल्या बांधकामे (बांधकाम खर्च २.८५ लक्ष + Child Friendly Elements ०.२५ लक्ष) | २.६० लक्ष | ३.१० लक्ष | १९.२३% |
| | ६. शालेय स्वच्छतागृह मुलांकरिता<br>७. शालेय स्वच्छतागृह मुलींकरिता | २५०००/-<br>२५०००/- | ४००००/-<br>४००००/- | ६०%<br>६०% |
| | ८. शाळांना पिण्याच्या पाण्याची सुविधा | २५०००/- | ४००००/- | ६०% |
| | ९. शालेय विद्युतीकरण | १००००/- | १५०००/- | ५०% |
| | १०. संरक्षक भिंत बांधकाम (प्रती मी.) | २१००/- | २५००/- | १९% |

उपरोक्त एकक रकमेशिवाय महानगरपालिका व प्रचलित जिल्हा दरसूचीप्रमाणे व भौगोलिक परिस्थितीनुसार ज्या जिल्ह्यांना जास्त रक्कम लागणार आहे, ती रक्कम Child Friendly Element करता लागणाऱ्या रु. २५००० (प्रति वर्गखोली बांधकाम) रकमेचा अंतर्भाव करुन पुढीलप्रमाणे ठरविण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | भाग | अंदाजित एकक रक्कम (रु.) एक वर्गखोली शाळा बांधकाम |
|---|---|---|
| १. | मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामे | ६०००००/- |
| २. | ठाणे जिल्हा अंतर्गत महानगर पालिका क्षेत्रातील बांधकामे | ४७५०००/- |
| ३. | ठाणे जिल्हा अंतर्गत बांधकामे | |
| | अ) सपाट भागातील बांधकामे | ३०००००/- |
| | ब) अतिदुर्गम / डोंगराळ / काळ्या मातीतील बांधकामे | ३३००००/- |
| ४. | पुणे महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामे | ४७५०००/- |
| ५. | पुणे जिल्हा परिषद अंतर्गत बांधकामे | |
| | अ) सपाट भागातील बांधकामे | ३०००००/- |
| | ब) अतिदुर्गम / डोंगराळ / काळ्या मातीतील बांधकामे | ४०००००/- |

उपरोक्त सर्व एकक दर हे सन २००८-०९ चे सर्व शिक्षा अभियान बांधकामांकरिता लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
अभ्यासगटांचे सर्व सदस्य / पदाधिकारी
अधिदान व लेखाधिकारी, बृहन्मुंबई.
निवासी लेखाधिकारी, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर.

**प्रत,**
निवड नस्ती, प्राशि-१